सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : विकाअ/शिक्षण/२०२३/ 1104

दिनांक 17 APR 2023

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व तांत्रिक पदविका,पदवी, पदव्युत्तर पदवी

अभ्यासक्रमाच्या संस्था,अमरावती विभाग,

अमरावती.

**विषय : ज्या कर्मचाऱ्यांचे / विद्यार्थ्यांचे आधार काढून १० वर्षे पूर्ण झाली अश्या कर्मचारी / विद्यार्थ्यांच्या आधारला कागदपत्रे अद्ययावत करणेबाबत...**

**संदर्भ** : निवासी उपजिल्हाधिकारी, तथा नोडल अधिकारी, आधार जिल्हाधिकारी कार्यालय,अमरावती यांचे पत्र क्रमांक No.COLAMR-३१०१३(१९)/४/२०२३-IT CELL

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, निवासी उपजिल्हाधिकारी, तथा नोडल अधिकारी, आधार जिल्हाधिकारी कार्यालय,अमरावती यांचे संदर्भिय पत्रानुसार ज्या कर्मचाऱ्यांचे / विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढून १० वर्षे पूर्ण झाली अश्या कर्मचाऱ्यांचे / विद्यार्थ्यांचे आधार ला कागदपत्रे अद्ययावत (Aadhaar Document Update/upload) करणे आवश्यक आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयातील ज्या कर्मचाऱ्यांचे / विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढून १० वर्षे पुर्ण झाली व या कालावधीमध्ये त्यांनी त्यांच्या नावा संबंधित व पत्त्यासंबंधित माहिती अद्ययावत केलेली नाही अशा कर्मचारी व विद्यार्थ्यांनी आपल्या नावाचे व पत्त्याचे पुरावे घेवून आधार केंद्रावर जाऊन अपलोड करुन घ्यावे किंवा myaadhaar.uidai.gov.in या संकेतस्थळावर स्वत:हून सुध्दा कागदपत्रे अपलोड करुन घेवू शकतात तसेच mAadhaar ॲप मार्फत कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे. सदर ॲप हे Google Play Store ला उपलब्ध आहे. तरी याबाबत आपल्या महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे. अशा प्रकारची दहा वर्षे उलटून गेलेली आधार कार्ड अपलेट / न झाल्यास भविष्यात हे आधार क्रमांक व्यक्ती मृत समजून निष्क्रिय करण्यात येण्याची शक्तता नाकारता येत नाही याची सुध्दा जाणीव करुन देण्यात यावी.

**सहपत्र** : वरीलप्रमाणे

**(डॉ.व्ही.आर.मानकर)**

**प्र.सहसंचालक**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती.

**प्रत: प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना ईमेल करण्यासाठी.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
# जिल्हाधिकारी कार्यालय
कॅम्प रोड, अमरावती -४४४६०२

☎:-०७२१-२६६२०२५ E-Mail ID :- rdc.da.amr-mh@nic.in
☎:-०७२१-२६६२४९३ Website:- https://amravati.gov.in

प्रति,

१. मा.कुलगुरू,संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ.

२ सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग,अमरावती विदर्भ संस्था परिसर, अमरावती

३.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय अमरावती,
शासकिय तंत्रनिकेतन परिसर,गाडगे नगर, अमरावती-४४४६०३

368

**विषय:-** ज्या कर्मचा-यांचे/ विदयार्थ्यांचे आधार काढून 10 वर्षे पूर्ण झाली अश्या कर्मचारी/ विदयार्थ्यांच्या आधार ला कागदपत्रे अदयावत करणेकरिता सर्व महाविदयालयांना सूचित करणेबाबत.

उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने ज्या कर्मचा-यांचे/ विदयार्थ्यांचे आधार कार्ड काढून 10 वर्षे पूर्ण झाली अश्या कर्मचा-यांचे/ विदयार्थ्यांचे आधार ला कागदपत्रे अदयावत (Aadhaar Document Update/uplode) करणे आवश्यक आहे. त्यानुसार आपणास कळविण्यात येत आहे की, ज्या कर्मचा-यांचे/ विदयार्थ्यांचे आधार कार्ड काढून 10 वर्षे पुर्ण झाली व या कालावधीमध्ये त्यांनी त्यांच्या नावा संबधित व पत्त्यासंबधित माहिती अदयावत केलेली नाही अशा कर्मचारी व विदयार्थ्यांनी आपल्या नावाचे व पत्त्याचे पुरावे घेवून आधार केंद्रावर जाऊन अपलोड करून घ्यावे किंवा myaadhaar.uidai.gov.in या संकेतस्थळावर स्वतःहून सुध्दा कागदपत्रे अपलोड करून घेवू शकतात.तसेच mAadhaar ॲप मार्फत कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे. सदर ॲप हे Google Play Store ला उपलब्ध आहे. तरी याबाबत सर्व महाविदयालयातील कर्मचारी व विदयार्थ्यांना आपल्या स्तरावरून सूचित करण्यात यावे. अशा प्रकारची दहा वर्षे उलटून गेलेली आधार कार्ड अपडेट/ न झाल्यास भविष्यात हे आधार क्रमांक व्यक्ती मृत समजून निष्क्रिय करण्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

Signed by Vivek
Basvantrao Ghodke
Date: 29-03-2023 17:46:29
Reason: Approved

सहसंचालक तंत्र शिक्षण,
प्रादेशिक कार्यालय अमरावती
1430 1215

निवासी उपजिल्हाधिकारी,
तथा नोडल अधिकारी, आधार
जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती

*This Document Is Digitaly Signed